# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. सर्वसाधारण सभा दिनांक १५ /११/२०१८

सभा सुचना क्रं. ०६ सायं ४.३० वा.

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/१०/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/१०/२०१८ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक :- (चंद्रकांत गोरीवले)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | निरंक |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - ई, नालासोपारा (प.) मधील कै. श्री अनिल पांडूरंग शिंदे, लिपीक टंकलेखक यांचा मुलगा कु. रोनिल अनिल शिंदे यांना महानगरपालिका सेवेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत. | निर्णय/ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी कै.श्री. अनिल पांडुरंग शिंदे , लिपीक टंकलेखक, प्रभाग समिती - इ, नालासोपारा (प.) हे सेवेत असताना दि. ०३/०५/२०१८ रोजी दिवंगत झाल्याने त्यांचे पश्चात त्यांचा वारस मुलगा कु. रोनिल अनिल शिंदे यांना महानगरपालिकेच्या सेवेत अनुकंपातत्वावर "शिपाई" या पदावर खुल्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यास आजची ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (किशोर ग.पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - एच, नवघर -माणिकपुर मधिल कै.श्री. मायकल सबेस्टीन घोन्सालविस, लिपीक - टंकलेखक यांची मुलगी कु. सिम घोन्सालविस यांना महानगरपालिका सेवेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत. | निर्णय/ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी कै. श्री. मायकल सबेस्टीन घोन्सालविस, लिपीक टंकलेखक, प्रभाग समिती - एच, नवघर-माणिकपूर हे सेवेत असताना दि. ३१/०३/२०१० रोजी दिवंगत झाल्याने त्यांचे पश्चात त्यांची वारस मुलगी कु. सिम मायकल घोन्सालवीस यांना महानगरपालिकेच्या सेवेत अनुकंपातत्वावर "शिपाई" या पदावर खुल्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यास आजची ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (वृंदेश पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -आय, वसई मधिल कै. श्री. सुजीत अशोक पवार, लिपीक-टंकलेखक यांची पत्नी श्रीमती मनिषा सुजीत पवार हयांना महानगरपालिका सेवेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत. | निर्णय/ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी कै. सुजित अशोक पवार , लिपीक टंकलेखक, प्रभाग समिती -आय, वसई हे सेवेत असताना दि. ०७/०४/२०१७ रोजी दिवंगत झाल्याने त्यांचे पश्चात त्यांची वारस पत्नी श्रीमती मनिषा सुजित पवार यांना महानगरपालिकेच्या सेवेत अनुकंपातत्वावर "मजुर" या पदावर खुल्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यास आजची ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (मनिष वर्तक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | श्री आकाश अनंत कदम यांना लाड समितीच्या शिफारशी नुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावुन घेणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई आस्थापनेवरील कर्मचारी कै. श्री. सुहास लक्ष्मण पवार सफाई कामगार हे दिनांक २३/०३/२०१५ रोजी मयत झाले असुन त्यांचा भाचा आकाश अनंत कदम (वय १८ वर्षे ) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- ( प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | श्री जतिन अनंत सोंडकर यांना लाड समितीच्या शिफारशी नुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावुन घेणेबाबत. | निर्णय/ठराव:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्री.अनंत तुकाराम सोंडकर सफाई कामगार हे दिनांक ३१/०१/२०१६ रोजी नियत वयोमानानुसार महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा मुलगा जतिन अनंत सोंडकर (वय २९ वर्षे ) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- ( विद्या पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | श्री. हितेश रतीलाल सोलंकी यांना वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती देणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - सी, चंदनसार विरार विभाग येथील कर्मचारी श्रीमती शारदा रतिलाल सोलंकी, सफाई कामगार हे दिनांक दि. ३१/०७/२०१८ रोजी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असुन त्यांचा मुलगा श्री. हितेश रतिलाल सोलंकी (वय ३३ वर्षे, ६ महिने) यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य |

| | | |
|---|---|---|
| | | विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसाहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने श्री. हितेश सोलंकी यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने वसई विरार शहर महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस आजची ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या स्कायवॉकवर प्रत्येकी एक लिफ्ट बसविणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित असलेल्या विरार (पू) व पश्चिमेला जोडणाऱ्या स्कायवॉकला चढणे उतारणेसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे दोन लिफ्ट बसविणेच्या अंदाजपत्रकिय रक्कम रु.९३,०२,५१७/- इतक्या रक्कमेस आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत आहे महानगरपालिका हद्दितील नवघर वसई रोड येथील स्कायवॉक व नालासोपारा येथील ओव्हर ब्रिजला आवश्यकतेप्रमाणे लिफ्ट बसविण्यात याव्यात. याकामी होणाऱ्या अंदाजपत्रकिय रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे याकामी पुढील कार्यवाही करणेचे अधिकार आजची सर्वसाधारण सभा मा.आयुक्त यांना प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- ( पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | **'ई' गव्हर्नन्स प्रकल्पाअंतर्गत आधुनिकरण करणेकामी मे. असेंटेक यांनी केलेल्या कामाचे उर्वरित देयक अदा करणेबाबत.** | **प्रस्तावाचा ठराव /निर्णय :-** सदर बाबत सभागुहात सविस्तर चर्चा करणेत आली. **'ई' गव्हर्नन्स प्रकल्पाअंतर्गत आधुनिकरण करणेकामी 'मे. असेंटेक' यांनी केलेल्या कामाचे उर्वरित देयक रु.** 3.70 **कोटी अदा करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.**<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२. | **सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वार्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागांराची नियुक्ती करुन ई-निविदा मागविणेकामी होणाऱ्या खर्चास** | **प्रस्तावाचा निर्णय :-** सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करुन ई-निविदा मागविणे कामी होणाऱ्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्धारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- ( उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई -निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत. | |
| १३. | सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने,स्मशानभुम्या व इतर ठिकाणी बसण्याकरीता बेंचेस पटट्या व संबधित इतर आवश्यक साहित्य बसविणे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे कामी मान्यता देणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने, स्मशानभूम्या व इतर ठिकाणी बसण्याकरिता बेंचेस पट्टया व संबधित इतर आवश्यक साहित्य बसविणे कामी होणाऱ्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- ( चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १४. | सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमीनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणूक करुन ई -निविदा मागविणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे कामी मान्यता देणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणूक करुन ई-निविदा मागविणे कामी होणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- ( अब्दुल हक पटेल ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १५ | सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्मशानभूमीकरीता कास्ट आयर्नच्या शवदाहीन्या पुरवठा करणे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा | प्रस्तावाचा निर्णय :- सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्मशानभूमीकरीता कास्ट आयर्नच्या शवदाहीन्या पुरवठा करणे कामी होणाऱ्या अपेक्षित खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- (अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| | कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे कामी मान्यता देणेबाबत. | |
| १६. | वाहन विभागाकडील सन २०१८-१९ वित्तीय वर्षामधील समाप्त झालेली तरतुद वाढीव करुन मिळणेबाबत. | **प्रस्ताव / निर्णय :-** सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन चर्चा केली असता वाहन विभागाकडील लेखाशिर्षांची सन २०१८-१९ च्या मुळ तरतुदीमध्ये वरीलप्रमाणे मा. स्थायी समितीने वाढीव तरतूदीस मान्यता दिल्यानूसार रक्कम रुपये २,००,००,०००/- तरतुद उपलब्ध करुन दिलेल्या कार्यवाहीस व त्याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीस आजची सर्वसाधारण सभा कार्योत्तर मंजुरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- ( सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १७. | स्वच्छता निरीक्षक यांना वाहनभत्ता व ठेका अभियंता यांना पेट्रोलभत्ता देणेस मंजुरी मिळणेबाबत. | ठराव / निर्णय :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन त्यावर साधक-बाधक चर्चा करण्यात आली. त्यानूसार स्वच्छता निरीक्षक यांना प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या रु. १५०००/- भत्त्याऐवजी मासिक रक्कम रु. ३०००/- इंधन भत्ता अदा करण्यास व ठेका अभियंता यांना प्रस्तावित केलेनूसार मासिक रक्कम रु. ३०००/- इंधन भत्ता अदा करण्यास हि सभा सर्वानुमते मंजूरी प्रदान करित आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १८. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या पूर परिस्थितीवर कायस्वरुपी तोडगा काढण्यासाठी आय आय टी, मुंबई व निरी या संस्थांच्या नियुक्ती बाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात भविष्यांत पूर परिस्थिती निर्माण होवू नये म्हणून कायम स्वरुपी उपाययोजना करणेकामी निरी/आय. आय. टी. हया तांत्रिक तज्ञ संस्थाची नियुक्ती करणेस तसेच त्यांना हयाकामी रु.१२०० लक्ष (बारा कोटी) अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे. त्यांचेकडून करावायाच्या उपाययोजनांबाबत अहवाल तयार करणेसाठी कालबध्द कार्यक्रम मागविण्यात यावा व त्यानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही करणेत यावी असे ही सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- ( सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १९. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील सातीवली येथील वॉर्ड नं.७५ येथे सर्व्हे नं.१५ मध्ये तरण तलाव व स्पोटर्स कॉम्प्लेक्स बांधणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवुन उपरोक्त नमुदकामी होणाऱ्या रक्कम रु ४,६२,३१,४४०/- इतक्या अंदाजपत्रकिय खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीसाठी मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- ( सुनिल आचोळकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| २०. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये,माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी वर्गास मुदतवाढ देणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) नुसार मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा कालावधी साधारणत: माहे ०७ डिसेंबर २०१८ रोजी संपुष्टात येत आहे. यानुसार वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगापेन केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी आवश्यक असलेला वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यासाठी कंत्राटी नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या पुन्हा पुन्हा थेट मुलाखती न घेता वैद्यकीय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने ही सेवा विस्कळीत होऊ नये याकरीता वैद्यकीय अधिकारी /कर्मचारी वर्गास १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. तसेच वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या रिक्त असलेल्या पदांची आवश्यकता लक्षात घेता सदरहु रिक्त असलेली पदे यापूर्वी भरण्यात आल्यानुसार थेट मुलाखती घेऊन भरणेस वर्तमानपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करुन पुढील प्रक्रिया करणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २१. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील व माताबाल संगोपन केंद्रातील गरजू रुग्णांना वित्तीय वर्ष २०१८-१९ , २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीत 'रक्त व रक्त घटक पुरविणे ' या कामाची ई-निविदा प्रसिध्द करणे व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास मंजूरी मिळणेबाबत. | ठराव / निर्णय : वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील व माताबाल संगोपन केंद्रातील गरजू रुग्णांना वित्तिय वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीत 'रक्त व रक्तघटक पुरविणे' या कामाची ई-निविदा प्रसिध्द करणे व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास मंजूरी मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, "रक्त व रक्तघटक पुरविणे" या बाबींची आवश्यकता लक्षात घेता खालील नमूद घटकांकरीता ई-निविदा मागविणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १ | संपूर्ण रक्त (Whole Blood) |
| २ | लाल पेशी (Packed Red Cells) |
| ३ | प्लाझ्मा (Fresh Frozen Plasma) |
| ४ | प्लेटलेट्स (Platelet Concentrate) |
| ५ | क्रायोप्रसिपिटेट (Cryoprecipitate) |

| | | |
|---|---|---|
| | | वित्तिय वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीत 'रक्त व रक्तघटक पुरविणे' या कामाकरीता अंदाजे प्रति वर्षी रु.५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च "रुग्णालयातील गरजू रुग्णांना रक्त व रक्तघटक पुरविणे" या लेखाशिर्षाखाली नमुद तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. सबब महानगरपालिकेच्या रुग्णालयातील व माताबाल संगोपन केंद्रातील गरजू रुग्णांना वित्तिय वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीत 'रक्त व रक्तघटक पुरविणे' या कामाची ई-निविदा प्रसिध्द करणे व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २२. | नारींगी ते चिखलडोंगरी येथे खारभुमी योजनेवर अतिरीक्त उघाडीचे बांधकाम करणेबाबत. (चैनेज २ किमी, ४किमी व ६किमी) | निर्णय :- सदर प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यात आली नारंगी ते चिखलडोंगरी येथे खारभुमी योजनेवर अतिरीक्त उघाडींचे बांधकाम करण्याकरीता रक्कम रु.१,३४,८६,६८९/- इतका निधी खारभुमी विकास विभाग यांचेकडे वर्ग करण्याकामी आवश्यक कार्यवाही करणे करीता ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- ( सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २३. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील माहे जुलै महिन्यात अतिवृष्टी झाल्यामुळे ज्या नागरीकांचे आर्थिक नुकसान झाले अशा नागरीकांना मालमत्ता करात सूट मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन केले असता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत माहे जुलै महिन्यात अतिवृष्टी झाल्यामुळे ज्या नागरीकांचे आर्थिक नुकसान झाले अशा नागरीकांची नावे शासनाच्या (तहसीलदार कार्यालय) यादीत आलेली आहेत अशा मालमत्ता धारकांना सन २०१८-१९ च्या (शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर व अग्निशमन कर वगळून उर्वरीत सामान्य कर) मालमत्ता करातून सुट देण्यात येत आहे. तसेच ज्या मालमत्ता धारकांनी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाची घरपट्टी भरणा केलेली आहे अशा मालमत्ता धारकांच्या सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या मालमत्ता करात समायोजन करण्यास तसेच ज्या मालमत्ताधारकांनी पाच वर्षाचा आगाऊ कराचा भरणा केला असल्यास अशा मालमत्ता धारकांचा पाच वर्षापुढील वित्तीय वर्षाचा मालमत्ता कर समायोजन करण्यास हि सभा मंजूरी देते आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव**

**वसई विरार शहर महानगरपालिका**